# रे.दि.मु.क्र. १२४/२०२१ मधील निशाणी क्र. २१ खालील आदेश

प्रतिवादी क्र. १ याने प्रस्तुतचा अर्ज त्याला दाव्याची लेखी कैफियत दाखल करण्यासाठी झालेला विलंब माफ करून त्याची कैफियत व म्हणणे अभिलेखावर स्वीकारण्यात यावी याकरिता दाखल केला आहे. वादीतर्फे प्रस्तुत अर्जावरच त्याचे म्हणणे दाखल करण्यात आले आहे.

२) प्रस्तुत प्रतिवादीने प्रस्तुत अर्जात असे कथन केले आहे की, वादीने प्रतिवादींविरूद्ध एकत्रित कुटुंबातील मिळकतीचे वाटप होऊन मिळण्याबाबत वाटपाचा दावा दाखल केला आहे. सदर दाव्याचे समन्स प्रस्तुत प्रतिवादीस मिळाले. त्यानंतर त्याने वकिलामार्फत हजर होऊन कैफियत व म्हणणे देण्यास मुदत घेतले. प्रस्तुत प्रतिवादीचे मार्च २०२२ दरम्यान मोटरसायकलवरून पडून अपघात झाले. सदर अपघातात त्याचा पाय फ्रॅक्चर झाल्यामुळे त्याला कमल आर्थोपेडीक सेंटर, जत येथे उपचारासाठी दाखल केले. त्यामुळे वेळेत येऊन वकिलांना भेटून म्हणणे व कैफियत दाखल करण्यास विलंब झाला आहे. सदर दाव्याची नेमली तारीख २९/०६/२०२२ रोजी असून प्रस्तुत अर्जासोबत कैफियत व तूर्तातूर्त ताकीद अर्जास म्हणणे दाखल करत आहे. तरी झालेला विलंब माफ होऊन कैफियत दाखल करून घेण्यास परवानगी असावी. जर विलंब माफ झाला नाही तर प्रस्तुत प्रतिवादीच्या मिळकतीतील हिश्यास मुकावे लागणार असून त्याचे अपरिमित असे आर्थिक नुकसान होणार आहे. उलट त्याची कैफियत व म्हणणे दाखल करून घेतल्यास न्यायदानास मदत होणार आहे. सबब, झालेला विलंब माफ होऊन प्रस्तुत प्रतिवादीची कैफियत व म्हणणे दाखल करून घेण्याबाबत आदेश व्हावा अशी विनंती प्रस्तुत प्रतिवादीतर्फे करण्यात आलेली आहे.

३) वादीतर्फे प्रस्तुत अर्जास असे म्हणणे दाखल केले आहे की, प्रस्तुत प्रतिवादीस नोटीस बजावणी होऊन सात ते आठ महिन्यांचा कालावधी झालेला आहे. तरी सदरचा अर्ज रक्कम रू. १०००/– कॉस्टवर मंजूर करण्यात यावा

अथवा नामंजूर करावा अशी विनंती वादीतर्फे करण्यात आली आहे.

४) अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. संचिकेचे व सोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन केले. उभय पक्षकारांतर्फे विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

५) प्रकरण संचिकेचे अवलोकन केले असता प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी व पृथ्थक कब्जा मिळण्याकरिता दाखल करण्यात आलेला आहे. दावा उभय पक्षकारांच्या स्थावर मिळकतीतील हक्क व हितसंबंधाबाबतचा आहे. प्रस्तुत प्रतिवादींना कैफियत दाखल करण्याकरिता झालेल्या विलंबाबाबत दिलेले कारण अजिबातच विचारात घेण्यासारखे नाही असे नाही. प्रस्तुत प्रतिवादीला दि. २०/१२/२०२१ रोजी दाव्याचे समन्स बजावलेचे दिसून येते. प्रस्तुत प्रतिवादी हा दाव्याचे कामी दि. २२/१२/२०२१ रोजी हजर होऊन त्याने प्रस्तुतचा अर्ज हा आज दि. ०६/०७/२०२२ रोजी दाखल केला आहे. त्यामुळे वाद विषयाचे अंतिमतः निराकरण करण्यासाठी आणि नैसर्गिक न्यायतत्त्वाआधारेही प्रस्तुत प्रतिवादीला त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देणे जरुरीचे आहे. तसेच प्रकरण संचिकेचे अवलोकन केले असता प्रस्तुत प्रतिवादीस कैफियत दाखल करण्यास विलंब झाला असला तरी त्याच्याविरुद्ध अद्याप दावा विनाकैफियत चालविण्याचा आदेश पारित करण्यात आलेला नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रतिवादीला कैफियत दाखल करण्यास झालेल्या विलंबाचा व प्रकरणातील सर्व परिस्थितीचा सारासार विचार केला असता प्रस्तुत प्रतिवादीने वादीला खर्चाची एकूण रक्कम रुपये १५०/- देण्याचे आदेशीत केल्यास प्रस्तुत प्रकरणात न्यायोचित समतोल साधला जाईल असे माझे मत आहे. या सर्व विवेचनावरून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

१. प्रस्तुतचा अर्ज प्रस्तुत प्रतिवादीने वादीला खर्चाची एकूण रक्कम रू. १५०/- देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रस्तुत प्रतिवादीने वादीला खर्चाची रक्कम अदा केल्यानंतर त्याला लेखी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करून त्याने या अर्जासोबत दाखल केलेली त्याची लेखी कैफियत अभिलेखावर स्वीकारण्यात यावी.

EKNATH KOYAPPA CHOUGALE

Digitally signed by EKNATH KOYAPPA CHOUGALE
Date: 2022.12.22 11:03:42 +0530

स्थळ:– जत (एकनाथ को. चौगले)

दि. २१/१२/२०२२ (JO Code -MHSN2400)

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,

जत

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी असे प्रमाणित करतो की, या पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर व मूळ आदेशामधील मजकूर हा एकसारखा आहे.

| | |
|---|---|
| स्टेनोग्राफरचे नांव | श्री. एस. ए. जमादार (लघुलेखक श्रेणी–III) |
| कोर्टाचे नांव | श्री. एकनाथ को. चौगले.<br>दिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, जत. |
| दिनांक | २१/१२/२०२२. |
| पीठासीन अधिकारी यांनी सही केलेली तारीख | २१/१२/२०२२. |
| आदेश अपलोड केलेली तारीख | २२/१२/२०२२. |